मासिकांक १९

दिनांक: २९ नोव्हेंबर २०२२

# 'ती'चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी




संपादक: सौ. सायली -अक्षय देशपांडे

"ती"चं पान
तिच्याकडून सगळ्यांसाठी

| | |
|---|---|
| संपादक | सौ. सायली अक्षय देशपांडे |
| अतिथी संपादक | सौ. सुषमा (देशपांडे) मुलमुले |
| मुखपृष्ठ | सुमंत बिवलकर |
| अंकातील व्यंगचित्रे (आठवणीतले “भाई”) | कपिल घोलप (Kapil Gholap Illus-trations) |
| अंक मांडणी | अक्षय देशपांडे |

पु.लंच्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे सर्व हक्क संबंधित पुस्तक प्रकाशकांकडे राखीव

(सर्व मुखपृष्ठे www.bookganga.com वरुन साभार)

www.tichapaan.com

tichapaan@gmail.com

फेसबुक पेज

७३७८४९९९७७

टीप:

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखनातील मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

# अंतरंग


| | |
|---|---|
| १. प्रस्तावना | ४ |
| २. दोन शब्द | ६ |
| ३. आठवणीतले भाई | ९ |
| ४. स्मृतीशालाका | १४ |
| ५. पु.ल.(भाईं)नी ठेवलेला वारसा !! | १९ |
| ६. फिरकी | २२ |
| ७. प्रिय भाई | २७ |
| ८. प्रवासवर्णनातील पु.ल. | २८ |
| ९. संगीतकार पु.ल. | ३३ |

# प्रस्तावना

रसिकहो नमस्कार..!

"ती" चं पान या मासिकांतून आजवर अनेक विषय आपल्या सारख्या रसिक वाचकांसमोर आम्ही मांडत आलो. आणि त्याला आपला मिळालेला प्रतिसाद हा कायमच नवीन काहीतरी लिहायला भाग पाडत असतो. त्या न्यायाला यंदाचा हा 19 वा मासिकांक सुद्धा अपवाद नाही.

"भाई" अर्थातच आपल्या सगळ्यांचे लाडके पु.ल. देशपांडे यांच्यावर शब्दांकित असलेला हा अंक. भाई आणि भाईंचं साहित्य आमच्या पिढीसाठी आदर्श तर आहेच त्याहीपेक्षा मनात एक जीवाभावाचं मैत्र निर्माण करणारा एक सुरेख धागा आहे असं मला वाटतं. सोपं आणि साधं लिहिणं हे कठीण आणि गुंतागुंतीचं लिहिण्यापेक्षा कठीण असतं हे काही खोटं नाही. मात्र हे साधलं ते पुलंना. त्यांचं कुठंलंही साहित्य हे एका ठराविक वयोगटासाठी नाहीच मुळी. अगदी लहानांपासून ते अगदी आजोबांपर्यंत कोणीही सहज त्यांच्या साहित्यावर प्रेम करु शकतं आणि ते आजतागायत होतंय आणि पुढेही होईल.

पुलंना शब्दबद्ध करणं इतकं सोपं नक्कीच नाही. पण या अंकात लिहीणाऱ्या सगळ्यांना हा प्रयत्न उत्तम साधलाय हे मात्र निश्चित. या अंकाचं मुखपृष्ठ तयार करुन देणाऱ्या आणि पुलंवर प्रेम करणाऱ्या सुमंत बिवलकर याला खूप खूप धन्यवाद. त्याचबरोबर यात दोन शब्द या मथळ्याखाली लिहून देणाऱ्या सुमेध बागाअीतकर याचे सुद्धा विशेष आभार. या अंकाचं अंतरंग सुशोभित करणाऱ्या अक्षय देशपांडे यांच्या मी ऋणातच राहू इच्छिते.

या अंकाला ज्यांच्या लेखणीमुळे अधिक शोभा प्राप्त झाली त्या सगळ्या माझ्या सख्यांचे

मनःपूर्वक अभिनंदन करते आणि या अंकावर सुद्धा आपल्या सारखे सहृदयी वाचक प्रेम करून याचे स्वागत करतील या आशेसह माझ्या लेखणीला विराम देते..!

- **सौ. सायली अक्षय देशपांडे**

# दोन शब्द

*मी हसतो, मलाच हसतो. माझे वाचकप्रेक्षकही मग मला हसतात आणि एकाएकी त्यांच्या लक्षात येतं की, आपण स्वत:लाच हसत आहोत.*

*समाजाच्या एकूण तब्येतीस ते बरं असतं . माझ्या लेखनातून एवढंच हाती लागावं , ही अपेक्षा.*

*पु. ल. देशपांडे*

एखाद्याने आपल्याला किती हसवावं याचा काही मापदंड नाही,पण हसवताना समाजाला नकळत रोजच्या आयुष्याचा आरसा दाखवणं किती जणांना जमेल? माझ्या माहितीत तरी आजपर्यंत एकच व्यक्ती आहे – पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे!

दररोज भेटणारी माणसं किती जण लक्षात ठेवू शकतात? त्यांची चालण्याची लकब , बोलताना होणारे इशारे इतकं सगळं कोण लक्षात ठेवेल? एखादा ठेवेलही, पण त्याचा उपयोग विनोदात कसा ओ जमावा? पण रोजच्या आयुष्यात एखादा प्राज्ञ मराठी बोलणारा सखाराम गटणे भेटतच असतो , एखादा ‘बाबा रे! तुझं जग वेगळं माझं जग वेगळं’ असं म्हणणारा नाथा कामत असतोच. कधीतरी चितळे मास्तरांसारखे प्रेमळ तर कधीतरी दामले मास्तरांसारखे हरणटोळ भेटतात.

पु. ल. सगळीकडे भेटत असतात. कधीतरी एखादं रीमिक्स केलेलं गाणं ऐकलं की पटकन ‘त्यांच्या सारखं एक चाल घेऊन बघा मूळव्याध होतं की नाही बघा’ म्हणणारे रावसाहेब आठवतात. कधीतरी पूर्वीचं पुणं राहिलं नाही ही वाक्य ऐकलं की भाई हमखास आठवतात. एखादं इतिहासाचं पुस्तक सुद्धा ‘आर पुराव्याने शाबीत करीन’ म्हणणाऱ्या हरितात्यांची आठवण करुन देतं.

पण पु. लं. काही फक्त विनोदापुरते मर्यादित नाहीत. पु. लं. एक वेगळेच विचारवंत म्हणून भावतात. पुलं एका वेगळ्याच विचाराचे होते. १९७७ नंतर आणीबाणीच्या समाप्तीची घोषणा झाली आणि सर्व विरोधी पक्ष एकत्र आले. मग यात पुलं तरी कसे मागे राहतील? महाराष्ट्राचं एक लाडकं व्यक्तिमत्व सुद्धा आणीबाणीच्या विरोधात आंदोलन करत होते. राजकारणात पुलं कधीच रमले नव्हते पण आंदोलन करताना कशाचे भान ठेवावे याबाबतीत त्यांनी सांगितलेली एक गोष्ट मला भावली. ते म्हणाले, आणीबाणी आता केव्हा आणि कशी संपणार, या निराशेच्या गर्तेत असलेले काही विद्यार्थी प्रतिनिधी त्यांना भेटायला आले होते. सत्याग्रह करून झाला, आणखी किती सत्याग्रहांमध्ये अटक करून घ्यायची, अशी त्यांची निराशाजनक तक्रार होती. 'पुलं'नी त्यांना मोलाचा सल्ला देताना महात्मा गांधींचे उदाहरण दिले. त्यांनी सांगितले, की गांधीजींच्या सत्याग्रहांचा अभ्यास करा. त्यांनीही स्वातंत्र्यलढ्यामध्ये काही काळ लढा स्थगित केला होता. असेही सांगितले. पुलंनी सावरकरांवर लिहिलेली वाक्य मला अनेकदा भावतात. पुलं म्हणतात मला प्रार्थना म्हणली की सावरकरांचं 'जयोस्तुते' ही कविता आठवते. हे संपूर्ण भाषण त्यांनी अंदमानच्या सेल्युलर जेलसमोर केलेलं आहे आणि ते ऐकत राहावं असंच आहे.

पुलंची काही पत्रे मजेशीर आहेत, एका पत्रात एका कुलकर्णी म्हणून इसमाने दूरदर्शनमध्ये हिन्दी संज्ञा वापरल्या जातात अश्या आशयाचे पत्र पुलंना पाठवले तेव्हा त्याचे उत्तर पुलंनी दिलेच पण सही करताना मात्र देशपांडे आणि कंसात यांच्या नावातच मराठी देश आणि हिन्दी पांडे हेही ध्यानात घ्यावे अशी एक मिश्किल कोटी सुद्धा केली आहे. पुलंना एका गणेशशास्त्री जोशी यांनी संस्कृत मध्ये पत्र पाठवलं आणि त्याचं उत्तरही पुलंनी संस्कृतातच दिलं ही विशेष.

पुलं अगदी मित्रासारखे वाटतात. आज त्यांची कथाकथन ऐकताना पूर्वीचं पुणे राहिलं नाही ही भावना मनातून उफाळून येते. कोणत्या हिट्टरगी च्या जंगलातले शिकारी भेटत नसले तरी शत्रूपक्षातली कुलकर्ण्यांची पाहुण्याला हाकलून लावायची आयडिया मात्र लोकांनी उचललेली आहे. सखाराम गटणे मात्र कमीच झालेत.

पुलं , कायम भेटत रहा. आम्ही कधीच 'कशाला आला होता रे बेळगावात' वाला सुर लावू शकत नाही. अगदी मित्रासारखे आहात, कायमच रहा.

तुमचाच एक चाहता..

**- सुमेध बागाअीतकर**

# आठवणीतले

# “भाई”

डॉ. मानसी सगदेव मोहरील

सोमवार होता, दुपारची वेळ साधारण 3 - 3:30 ची, शाळेच्या सुट्यांमुळे घरी भावंडं जमलेली. आम्ही गच्चीवर दंगा घालून परत खाली आलो तर आत्या - मामा, आई - पप्पा एका बातमीमुळे शांत पणे एकमेकांचे चेहरे पाहत बसले होते. "अर्रर, फारच वाईट झाले", मामांच्या तोंडून निघालेल्या उद्गाराने आम्ही जरा धास्तावलोच. पुन्हा तीच बातमी," पु. ल. देशपांडे ह्यांचे वृद्धपकाळाने निधन." दोन मिनिटं काय कसं व्यक्त व्हावं कळलंच नाही.

खरंतर खूप वाचन नव्हतं माझं. कॉमिक्स वगरे ठीक आहे, पण कधी अश्या मोठ्या लेखकांची पुस्तकं नव्हती वाचलीत मी. तेवढा मला रस नव्हताच. पण आजोबांच्या घरी एका फळी वर ठेवलेल्या पुस्तकांमध्ये गोल मटोल चेहऱ्याचे, कुरळे केस असणारे आणि मोठ्ठा चष्मा लावलेले पु. ल. मी नेहमी पाहायचे. लहान मुलांना आकर्षित करतील असे हसमुख आजोबा मला तिथे दिसायचे. मी

त्या फळी वरच्या 'त्या' पुस्तकाला हातात घ्यायची ते फक्त त्या हसमुख, गोल मटोल आजोबांना पाहायला. पुढे म्हटलं तसं, मला वाचनाची फार आवड नव्हती, त्यामुळे प्रत्येक पुस्तक अर्धवट वाचून किंवा एकदा चाळून झालं की माझं लक्ष भरकटायचं. पण हा चेहरा मात्र माझ्या खूप जवळचा होता. दूरदर्शन वर लागणाऱ्या मालिका, कथाकथनाचे व्हिडिओ किंवा नाटकं मी वारंवार

पाहायचे. गुळाचा गणपती हा सिनेमा तर कित्येकदा बघितला. व्यक्ती आणि वल्ली बद्द्दल मला प्रचंड आकर्षण होत ते त्यावर आधारित मालिकेमुळे. त्यांच्या बद्दल टि.व्ही. वर किंवा ऑडिओ कॅसेट्स मधून जेवढं ज्ञान होतं तेवढाच.




आयुष्यातल्या १२ - १३ वर्षांत मला पु. ल. कळलेत ते ह्याच माध्यमांमधून. पण त्यादिवशी ती बातमी ऐकली आणि मन खरंच सुन्न झालं. त्यांच्यावर प्रसारित झालेल्या प्रत्येक कार्यक्रम त्या दिवसानंतर मनात एक पश्चातापाची भावना घेऊन आला. त्यांच्याबद्दल जवळपास ३ - ४ आठवडे सतत अग्रलेख छापुन येऊ लागलेत, राजकारणी, अभिनेते, साहित्यिक, सामान्य जनता सगळेच हळहळ व्यक्त करत होती आणि मन आणखीनच उदास होऊ लागले.

त्यांच्या पुस्तकांबद्दल लिखाणाबद्दल सगळे चर्चा करत, त्यांनी लिहिलेल्या पात्रांबद्दल बोलत, त्याचा हजरजबाबी स्वभाव, त्यांचं साधं राहणीमान, त्यांचे कष्ट, त्यांचं काम, त्यांचं लिखाण, त्यांचं संगीत, त्यांची गायकी, त्यांचं व्यक्तिमत्व अश्या अनेक पैलूंवर बोलल्या जात होत. पण मला ह्यातलं काहीच ठाऊक नव्हतं? का? वाचनाच्या अभावामुळे? मला अपराधी वाटू लागलं. एवढा मोठा लेखक, त्याच इतकं अमूल्य साहित्य आपल्या इतक्या जवळ असतांना आपण वाचलं नाही, ह्याची खंत सतत मनाला त्रास देत होती.

आणि मग मी वाचनाचा सपाटाच लावला. त्याकरता शाळेच्या लायब्ररीचा आधार मिळाला. पेपर मध्ये छापून आलेला साहित्य आणि लायब्ररीची पुस्तकं आणि मी. व्यक्ती आणि वल्ली पासून सुरुवात झाली , मग अघळ - पघळ, अपूर्वाई, गोळा बेरीज, बटाट्याची चाळ, नसती उठाठेव अश्या अनेक पुस्तकांमध्ये मी डोकं खुपसून बसायचे. एखादं पुस्तक वाचत असतांना दिवस रात्र त्याच्यातील पात्र माझ्या अवती भोवती जिवंत पणे वावरतात आहे असा भास होऊ लागे.

आजूबाजूच्या लोकांमध्ये पु.लं.ची पात्र मी शोधू लागले. आणि मग एक दिवस भक्ती बर्वेची एक जुनी मुलाखत पहिली. त्यात त्या मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडून सतत फुलराणी बद्दल ऐकून माझं मन त्यात गुंतलं. 'फुलराणी' ही कविता तशी लोकप्रियच पण ह्या नाटकाबद्दल तेवढं माहित नव्हतं. मग एकदा हे नाटक बघण्याचा योग आलाच. तेंव्हा त्या नाटकातले भाव समजण्या इतकी समज माझ्यात नव्हती कदाचित पण तो अनुभव सुद्धा एक वेगळंच सुख देऊन गेला. हळूहळू मला पु.लं. चा सहवास घडत गेला. मी अधिकाधिक साहित्य वाचू लागले. त्यातून मला कधी गंभीर तर कधी मिश्किल पु.लं. भेटू लागलेत.

विनोद हा त्यांच्या साहित्याचा एक भाग असला तरी आयुष्याचे धडे देणारं साहित्य सुद्धा मनाचा ठाव घेऊन जात. माझं लिखाण सुरु असतांनाच, मी एक वाचक सुद्धा बनत चालले होते. साध्या सरळ, सोप्या भाषेचा वापर करून सुद्धा एखाद साहित्य किती सुंदर प्रकारे सादर करता येतं हे मी पु.ल. कडून शिकले. बोली भाषा आणि लेखी भाषेतला फरक कसा जपायचा आणि दोन्ही भाषांचा मान राखून त्यांना आपल्या लेखणीत कसं उतरवायचं हे त्यांना चांगलंच ठाऊक होत आणि म्हणूनच कदाचित त्यांचं लिखाण प्रत्येकाला जवळच वाटतं.

आता वयाच्या तिशीत

आल्यावर पुन्हा एकदा त्यांच साहित्य वाचताना त्या प्रत्येक पुस्तकातील, नाटकातील अनेक अर्थ नव्याने समजू लागले आहेत. प्रत्येक पुस्तक वाचतांना त्या लिखाणामागचे अनेक नवे अर्थ मला लागत आहेत. ती खंत अजूनही मनात आहेच की ते हयात असत पर्यंत कधीही मला त्यांच्या साहित्याचं मोल कळलं नाही,( म्हणजे मी त्यांना व्यक्तीश: भेटू शकणार होते हे दूर दूर पर्यंत माझ्या मनात नव्हतं, तशी शक्यता सुद्धा नव्हती, पण हा विचार का मनात सारखा येतो आणि त्रास होतो कुणास ठाऊक?) पण ते गेल्यामुळे आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली होती आणि नंतर त्यांनीच ती भरुनही काढली. गोलगोल चेहऱ्याचे, कुरळ्या केसांचे, मोठ्ठा चष्मावाले ते आजोबा दृष्टीआड गेलेत पण मागे त्यांचा दृष्टिकोन ठेऊन गेलेत. त्या चित्रातल्या लोभसवाण्या चेहऱ्या मागे कित्येक पैलू होते हे मला कळले.

आता प्रसार माध्यमांनी आणि सोशल मीडियाने भाईंना आपल्या आणखीनच जवळ आणले आहे. पूर्वी, प्रसिद्ध झालेलं साहित्य हाच एक स्त्रोत असे पण आता त्यांनी लिहिलेली पत्र सुद्धा वाचायला मिळतात. डॉ. श्रद्धानंद ठाकूर ह्यांच्या संकलनातून अनेक छान छान गोष्टी मला वाचायला मिळाल्यात शिवाय. तसेच भाई आपल्या वैयक्तिक आयुष्यात कसे होते, त्यांची जीवन शैली, लिखाणाची पद्धत, त्यांचा हजरजबाबी स्वभाव, दैनंदिन आणि घरगुती जीवनातील आणखी अनेक गमती जमती मला गिरीश व वृंदा ठाकूर ( जे सुनीता बाईंचे भाचे आहेत) ऐकायला - वाचायला मिळाल्यात. ह्या दोघांकडून आम्हाला भाईंच्या आणि सुनीता बाईंच्या आयुष्यातील अनेक प्रेरणादायी प्रसंग सुद्धा ऐकायला मिळाले.

बरं फक्त पुस्तकांमधूनच नाही तर इतर माध्यमांतून सुद्धा आपण साहित्याच्या जवळ जाऊ शकतो हे सुद्धा भाईंनीच शिकवले आणि मला नाटक आणि कथाकथन हे दोन नवे मित्र मिळाले. भाईंची कथाकथनाच्या शैली

अतिशय विलक्षण! त्यांनी उभं केलेलं पात्र; हो, उभं केलेलं पात्र असेच मी म्हणेन कारण ते ज्या प्रकारे त्या पात्राचं वर्णन करत, ते पात्र अगदी जसंच्या तसं आपल्यापुढे उभं राही; तर त्यांनी उभं केलेलं पात्र हे अगदी आपल्या आजूबाजूचा एखादा व्यक्ती असावा इतकं जवळच आणि आपल्या ओळखीचं असे. त्यात आपल्याला आपलेच एखादे मास्तर, आपलाच एखादा सखा, आपल्याच वर्गातला एखादा आगावू विद्यार्थी, आपलाच घर गडी असे सगळे दिसतात. काळ बदलला असला तरी ती पात्र अजूनही तशीच आहेत. संदर्भ तेवढे बदलले. आणि म्हणूनच की काय हे कथाकथन मात्र मला फार आवडत, कदाचित त्यातलं प्रत्येक वाक्य हे आपल्या जीवनाशी निगडित असत म्हणून किंवा तो आपलाच एखादा अनुभव असतो म्हणून असेल पण मला त्यांचं लिखाण आणि ती शैली अतिशय जवळची वाटते. भाईंचा कथाकथन असो किंवा सुनीता बाईंचा काव्यवाचन; ऐकलं की ऐकतच रहावंसं वाटतं. त्यांचा साधेपणा आणि आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आहे हा खूप काही शिकवून जातो.

भाई गेल्याचे कळले त्या क्षणापासून ते आज पर्यंतचा माझा वाचनातला एकूणच प्रवास खूप विलक्षण घडला. मला व्यक्ती म्हणून घडवण्यात अनेक लेखकांचा हातभार लागला पण त्याची सुरुवात झाली भाईंमुळे! ते आबाल वृद्धांचे लाडके होते, ते प्रत्येकाचे आपले आणि जवळचे होते, किंवा मी म्हणेल ते त्यांच्या प्रत्येक श्रोत्या सारखे / वाचकांसारखे होते आणि म्हणूनच ते अजूनही आपल्या तितक्याच जवळ आहेत!!

- manasi.mohril@gmail.com

# स्मृतीशलाका

## - मैथिली अंजनकर

पुलंची शब्दसृष्टी म्हणजे अक्षय- अमर - अजय अक्षरसृष्टी होय. हसता हसता डोळ्याच्या कडा ओलावून जाव्यात अशा स्वरूपाची विलक्षण कारुण्याची झालर त्यांच्या विनोद लेखनाला प्राप्त झाली आहे. प्रचंड जीवनासक्त, प्रेरक, आश्वासक आणि जीवन चिंतन असणारे पुलं अनेक विषयात आयुष्यभर रस घेत जगले. साहित्य, संगीत, नाटक, अभिनय ,वादन-गायन, भ्रमण आणि असंख्यांना मदत करणारा विलक्षण प्रतिभेचा आधारवड असणारे पु.लं. चतुरस्त्र प्रतिभेच्या महान अष्टपैलू व्यक्तिमत्व होय .

पु. लं. आणि सुनीताबाई दोघेही एखाद्या द्वंद्वसमासागत जगले. आयुष्यात व्यवहार सांभाळला तो सुनीताबाईंनी आणि प्रतिभेच्या नभांगणात एखाद्या स्वच्छंद वैनतेयासारखे सारखे भरारत राहिले ते पु. लं .

त्या दोघांनी अमाप धन मिळवले व उदार हस्ते असंख्य व्यक्तींना , संस्थांना दान दिले . “बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले“ असे साक्षात मूल्य जगणारे पु.लं.चे व्यक्तिमत्व होते. त्यांनी साहित्यातून केवळ सामाजिक बांधिलकी उद्घोषित केली नाही तर ती बांधिलकी स्वीकारूनच आपले स्वतःचे जीवनयापन केले .

" बटाटयाची चाळ " हे पुस्तक पु .ल देशपांडे याचं विनोदी धाटणीचं पुस्तक असून मौज प्रकाशन गृह यांनी ते प्रकाशित केले आहे . पु. ल देशपांडे यांचं नाव घेताच मनामध्ये एक विनोदी छायाचित्र निर्माण होते. १७२ पानांची ही बटाटयाची चाळ ! प्रत्येक समाजाच्या सांस्कृतिक वैभव - वैशिष्ट्ये दाखविणाऱ्या काही गोष्टी असतात .

पु .ल. देशपांडे हे आपले सांस्कृतिक वैभव . बटाटयाची चाळ हे पुस्तक आले आणि त्यानंतर ही त्यावर आधारित नाट्यप्रयोगही आले . हा प्रयोग पाहाण्यासाठी मुंबईत तीनतीन तास रांगेत उभे राहून लोक तिकिट काढत होते अशा आठवणी सांगितल्या जातात.

पु. लं.च्या चाळीत वाचकांनी आणि प्रेक्षकांनीही स्वत:ला शोधले .सांस्कृतिक चळवळ , सांस्कृतिक शिष्टामंडळ , " गच्ची सह झालीच पाहिजे ". अशा एकूण १२ प्रकरणा मधून ही चाळ उभी राहाते .

पूर्वीची मुंबई ही बटाटयाची चाळी सारखी होती. नात्यांनी मजबूत , भावनेने प्रेमळ ,लहान मुलासारखी खोडकर आणि चळवळी . "व्यक्ती तितक्या प्रकृती " ही म्हण या चाळीकडेच पाहून सुचली असाव्या. दुसऱ्या महायुद्ध्याच्या आधीच्या जीवनशैलीचे वर्णन यामधे आढळुन येते.

पु. लं देशपांडे म्हणजे अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत ! पु. लं. आपलं जगणं समृध्द करतात. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन देतात. पु .ल यांनी उभी केलेली प्रत्येक व्यक्तिरेखा अगदी आपल्याला आपलीशी वाटते. आपल्या आजुबाजूला फ़िरत असतात. रोजच्या आयुष्यात येतात आणि भेटतात म्हणून पु .ल सर्वांना आपलेसे वाटतात. त्यांचा जन्म १९१९ स्वातंत्र्यापूर्वीला आणि मृत्यू २००० साली झाला. आयुष्याची ८ दशकं त्यांनी साहित्यसेवेत घालवली .त्यांच्या आयुष्यातील त्यांच्या साहित्यसेवेतला शिरोमणी म्हणजे " बटाटयाची चाळ " हसताहसता प्रत्येकाला अंतर्मुख करुन स्वत:मध्ये डोकावून पाहायला लावणारा. अगदी सुरुवातीला या पुस्तकाचे मुखपृष्ठ

आपल्याला आकृष्ट करून घेत. पुस्तकाच्या अंतरंगात काय असेल याची कल्पना आपल्याला आधीच येते. वर लक्षवेधी डेरेदार वृक्ष आणि त्याच्या फांद्या मध्ये बसवलेली बटाटयाची चाळ. हेही वरवर पाहाता ती प्रचंड गजबजलेली दिसते . यात चाळी फ़क्त आधारासाठी टेकू लागायचे बाकी . पण नाती मात्र वटवृक्षासारखी एकदम भक्कम त्यातही एक गंमत होती. हे मुखपृष्ठ आणि त्यातल्या सगळयाच व्यक्तिरेखा ,चित्रे वसंत सरवटे यांनी रेखाटली आहेत . पु .लं च्या पुस्तकाला फ़ार मोठी प्रस्तावना नाही . पु .लं नी फ़क्त मोजून चार ओळी तीन वाक्य




लिहिली आहे . तेवढीही त्यांना पुरेशी वाटतात. हा पुलंचा साधेपणा आहे . या पुस्तकात एकूण १२ प्रकरणे आहेत .

पहिली दोन प्रकरणे सांस्कृतिक चळवळ आणि सांस्कृतिक शिष्टामंडळ या दोन प्रकरणामध्ये व इतरही प्रकरणामध्ये त्यांनी प्रत्येक व्यक्तिरेखा स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे . प्रत्येक व्यक्तिरेखा विनोदी अंगाने रंगवताना त्यांचे वेगळेपण जपण्याचा पु. लं पुरेपूर प्रयत्न करतात. दोन्ही प्रकरणात ती चाळ त्यातील व्यक्ती आणि व्यक्तींकडून घडणारे किस्से यांचे ते वर्णन करतात.

या पुस्तकातील अजून एक सुंदर प्रकरण म्हणजे “गच्चीसह झाली पाहिजे”

याप्रकरणामध्ये गच्चींचा मालक नवा असल्याने तो काही नवीन सुविधा देण्याचा जाहीर करतो आणि गच्ची सर्वांसाठी खुली करतो. मग ती गच्ची आपली व्हावी यासाठी जी काही धमाल उडते ती या प्रकरणात दाखवलेली आहे.

"उपवास" हे प्रकरण तर फ़ारच मजेशीर आहे . पंताचं वजन वाढल्याने ते डायट करायच सुरु करतात .सुरु करताना त्या डायटचा कसा बोजवारा उडतो हे आजच्या काळातही समर्पक वाटणारी कल्पना त्यांनी यात रंगवलेली आहे. आजच्या काळातही डायटचे इतके सोहळे आहेत की नक्की कुठल्या सोहळ्याने आपले वजन कमी होईल समजत नाही . एकजण सांगतो भरपूर पाणी प्या , तर दुसरा म्हणतो की शरीलाला आवश्यक तेवढेच पाणी प्या – नाहीतर किडण्या खराब होतील. एकजण सांगतो सकाळी उठल्या उठल्या लिंबू-मध- पाणी प्या , तर दुसरा सांगतो की सकाळी उठल्यावर एक फळ खा .एक सांगतो की भात अजिबात खाऊ नका , दुसरा म्हणतो जिथे जे पिक उगवते तेच खाले पाहिजे म्हणून .. पंजाबातील माणसाने भरपूर गहु आणि कोकणातील माणसाने भरपूर भात खाला पाहिजे पण तसे शक्य होत नाही . एक म्हणतो दर दोन तासांनी खा, तर दुसरा म्हणतो फ़क्त दोनदाच खा आणि या सर्वाबरोबरच त्यांनी सांगितलेले विश्लेषण देखील आपल्याला पटत असते . मग यापैकी कुठला उपाय आपल्याला लागु होतो हे ठरविण्यात आपला वेळ , शक्ती खर्च होते आणि " नको ते डायट " म्हनून दैनंदिन जीवन सुरु होते . अशाप्रकारे आजच्या काळाशी हे प्रकरण साधर्म्य दाखवते .

पु .ल एक उत्तम नट होते. रंगभूमीवर त्यांनी बटाट्याच्या चाळीतील अनेक पात्र रंगविले याचे उत्तम उदाहरण म्हणजे "उपवास" या प्रकरणातील पंतांचे व्यक्तिचित्र त्यांनी आपल्या डोळ्यासमोर उभे केले आहे. यासह " गच्चीसह झालीच पाहिजे " या प्रकरणातील पात्र त्यांनी एकपात्री प्रयोगामध्ये हुबेहूब रंगविले

आहे गुळाचा गणपती या मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी नारायण या भोळ्या भाबड्या (नाऱ्याची) भूमिका अगदी उत्तमरित्या साकारली आहे चित्रपट पाहताना चित्रपटाचा नायक असलेला नारायण नाऱ्या पूर्ण चित्रपट आपल्याला खिळवून ठेवतो.

पुलंचे अभिनय कौशल्य आपल्याला त्या दिसून येते संस्कृत साहित्यातील प्रसिद्ध ग्रंथ असलेल्या नाट्यशास्त्रात भरतमुनींनी सांगितलेल्या अभिनय प्रकारातील आंगिक, वाचिक ,सात्विक व आहार्य अभिनय हे अभिनयाचे प्रकार पुलंनी साकारलेल्या नारायण मधून आपल्याला दिसून येतात. अंगिक, वाचक व सात्विक अभिनय दिसतोस शिवाय आहार्य अभिनय व त्याचे तीन मुख्य प्रकार सन्धिम , व्याजिम , देखील पाहायला मिळतो. आपल्याला या मुख्य हे प्रकार आपल्याला दिसून येतात परत उपप्रकारही आपल्याला या चित्रपटांमधून दिसून येतात. पुलंचे अभिनय कौशल्य आपल्याला यात दिसून येते.

पु. लं नी लिहिलेल्या “ नाचरे मोरा ” या गीताप्रमाणे ते सदैव चहात्यांच्या मनात देखण्या मोरासारखे अव्याहत नृत्य करीतच राहणार.

- maithileeanjankar@gmail.com

# पु. ल. (भाई ) नी ठेवलेला वारसा !!

## - सई (संजीवनी) मराठे

अं ! अं ! ...काय सांगते त पोरगी काही म्हणता काSSही कळत नाही रे बाबा ! अगं आजी , मी म्हणाले या अंकात आम्हाला पु.ल. देशपांडे यांच्या साहित्यावर लिहायचंय, पु पु SSS पुरुषोत्तमाचा लक्ष्मणाचा ल SSS लसूण ल , देशाचा देश आणि पांडे.. ऐकू आलं का?

हो नाहीतर काय... मला काय धाड भरली आहे ऐकू न यायला!असं इतकं का कुणी आवाज चढवून बोलतं आपल्या ज्येष्ठांशी ?

आजी जणू समरांगणात मी द्रोही आणि आजी क्रांतीवीर असल्याच्या अविर्भावात बोलत होती... अगं कनिष्ठ नव्हे जेष्ठ SS ,जेष्ठ अपत्य पूजन आहे म्हटलं...आसनी आहे आसनी... जरा सानवीच्या आवडी निवडी विचार.... चार गोष्टी विचार तिला नेहमीच काय आपलं सकाळपासूनच ....

अगं म्हणजे माझं म्हणणं होतं.... सकाळीच कशाला हवेत ना सगळे अमृतवचनं, संध्याकाळसाठी सुद्धा काही शिल्लक ठेवायला हवीत... हो की नाही गं सानवी....

“ शब्दां वाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले ”

दादा तुम्ही आहात हे कळले आणिक घडू नये ते घडले".... नारायणा !! तूच सांभाळ रे SS बाबा आता. ह्यांचं म्हणजे, संसार म्हणावं तर वैराग्य ऐकतील आणि मौंज म्हणावी तर मोक्ष ऐकतील. अहो आसनीला अजून महिनाभर वेळ आहे.

आणि काय गं पु.लं. चं साहित्य ना....विचार ना तुझ्या आजोबांना नामु परीट म्हण ! चितळे मास्तर म्हण ! म्हैस म्हण ! अंतू बर्वा म्हण ! घडाघडा सगळे मनाच्या श्लोका सारखे म्हणून दाखवतील तुला जणू काही पु.लं.चा पुनरावतारच! त्यांचीच तर री ओढण्याचं आजन्म व्रत घेतलंय तुझ्या दादांनी... त्यांच्या साहित्याचे रखवालदार आहे तुझे दादा श्री श्री गजाननराव भोसले म्हणजे.... आज आजीचा पारा चांगलाच तापला आहे ओळखून दादा गात गातच बाहेर आले,

आपसे SSS भी खूSSबसूरत आपके अंदाSSज है SS

आपकी आँखो मे कुछ.....

बस ..पुरे.. दमा ! दमा ! दमा आहे म्हटलं आपल्याला सांभाळून जरा उगाचच "घर" आतले किशोर कुमार बनू नका...

सानवी, बाळा बघ आता तूच पुरुषांवर बघ कोणती वेळ आली...

आम्ही गाई जातीच्या, नाही आम्हा वाचा

ती असती तरी तुमच्या, भेदीतेची हृदया ।।

असो.....गृहस्थाश्रम म्हंटला की एक काम तुम्हाला अपरिहार्यपणे करावं लागतं ...लक्षात घे बरं का सानवी ,अर्थ लक्षात घे,

" रागिणी मुखचंद्रमा, उजळी हृदयी पौर्णिमा

कोपता खुलतो कसा SSSSS ,

वदन शशीचा लालीमा SSSS ।।"

हे असं असतं ....एकाने समजा जन्मभर वाजंत्री वाल्याचाच उद्योग करतो म्हटलं तर दुसऱ्याला शिस्तप्रिय शिक्षिका बनावच लागेल की नाही ? - आजी एकदम "हमारे जमाने मे" च्या दुनियेत हरवून गेल्यागत म्हणाली.

अहो तुम्ही म्हणाल ती पूर्व दिशा आम्ही कोण "वाघ" देवी समोर बोलणारे.. पण कमाल आहे बुवा एका गोष्टीची ,छडी लागे छम छम , विद्या येई घमघम हे गाणं तुमच्याच हाताखालच्या एखाद्या उच्च विद्याविभूषित भाग्यवंतानी लिहिलेलं असावं हा मला निव्वळ योगायोग वाटत नाही का कोणास ठाऊक ?... दादा म्हणाले.

आजी हृदयनाथ मंगेशकरांना तू शिकवलं आहे ? काय काय ,हृदय काय ? हृदय काय ? चांगली आहे हो माझी तब्येत !

मी विचार करतच होती की या दोघांना यांचे सुखद मधूर संवाद कसे काय ऐकू येतात आणि मला मात्र काय ,काय म्हणत अख्खी चाळ भर आवाज जाईल अशा तार सप्तकात किंचाळायला लावतात. तेवढ्यात दादा म्हणाले अगं त्यांनाच कशाला... अजून पुष्कळ जण...शाळेत येणारे, न येणारे, भेटणारे ,अधून मधून दिसणारे ,अश्या कित्येकांना तिने खूपसे येणारे ,न येणारे असे अनेक विषय शिकवले आहेत.

काहीही का असेना मला यांच्या संवादावरून एक गोष्ट मात्र नक्की लक्षात आली की पुलंच्या साहित्यांनी प्रत्येक मराठी माणसात आणि मराठी कुटुंबात वादविवादाचा रस्ता हा मनात आणलं तर कसा मजेशीर होऊ शकतो हे शिकवलं. नामू परीट हा वेळेवर कधीही कपडे न देणारा ,दुसऱ्यांचे कपडे घालणारा, द्यायचा विसरला तर स्वतःकडेच ठेवणारा असा वाईट सवयींचा स्वतःकडे खजिना म्हणून ठेवलेली ही व्यक्ती, तरीही सर्वांना कशी काय इतकी प्रिय वाटते हे पटवून द्यायला आणि सांगायला सुद्धा पु.ल. च लागतात.

पु.लं विषयी लिहायला मला हा आजचा संवाद पुरेसा होता.

- sanjeeva-nee02marathe@gmail.com

# फिरकी

**- वर्षा पतके थोटे**

पु. ल. देशपांडे यांच्या लेखणीने सकसपणे लिखाण करून प्रकाशित पुस्तकांची बेरीज वाढवतंच नेली आहे. त्या अनेक पुस्तकांपैकी " गोळा बेरीज" हे त्यांचे एक पुस्तक आहे. माझ्या नुकतेच वाचण्यात आलेले हे पुस्तक लेख स्वरुपात आहे. हे पुस्तक १९६० साली प्रकाशित झाले. त्यानंतर या पुस्तकाच्या सात आवृत्या निघाल्या. साधारणतः या मध्ये तेरा लेख आहेत... आपल्याला माहिती आहे पु. लं ना लिखाणासाठी कुठलाही विषय वर्ज्य नव्हता आणि त्यांच्या लिखाणात कुठेही बोजडपणा नव्हता. जे जसं आहे ते तसं समोर मांडताना त्यांच्या स्वभावधर्मानुसार लिखाणाला एक विनोदी अंगाने येणारा खुसखुशीतपणा आणि एक प्रकारची फिरकी घेऊन ते लिहित असतं. असं त्यांचे लेखन वाचताना जाणवतं. या पुस्तकात सुद्धा प्रत्येक लेख वाचताना आपल्याला तेच जाणवतं. पण सखोलपणे विचार केल्यावर जाणवतं, ते हे की पु. ल. वरवरचे कधीच लिहायचे नाहीत. एक सखोलता होती त्यांच्या लिखाणात. ते लिहितांना लेखणीच्या फिरकीतून बरंच काही आपल्यापर्यंत पोहोचवत होते. फक्त वाचताना आपण किती सजगपणे वाचतो हे महत्वाचे आहे. मला गोळा बेरीज पुस्तक वाचताना प्रकर्षाने हे ही जाणवतं होतं की, पु. ल. लिखाणाच्या फिरकीतून एक उत्तम समीक्षकाची भूमिका पार पाडायचे. या पुस्तकात त्यांनी लिहिलेला एक लेख आहे ' मी नाही विसरलो' यामध्ये ते भाषेतील शब्दांची ओळख सहजपणे सांगतात आणि मग त्या

शब्दांचं काळाच्या प्रवाहात संपत जाणं आणि त्या ठिकाणी दुस-या शब्दाने स्थान अधोरेखित करणं किंवा होणं हा प्रवास पु. ल. फार भावुकतेने मांडतात असं मला जाणवलं...वाचताना जरी ते जाणवत नसलं तरी जुन्या शब्दाला मी विसरलो नाही किंवा तोच शब्द कसा परफेक्ट होता. हे उदाहरण देऊन ते सहज सांगून जातात आणि सजग वाचक त्या वाक्यापाशी रेंगाळतो. जशी मी ब -याच वेळ रेंगाळले. जसे की,




पु. ल. या लेखात एके ठिकाणी म्हणतात...

' पण उमाळ्यावरी येतसे सूर्य जेव्हा ' ह्या ओळी अंत: करणाचा ठाव घेतात.

माझ्या बालपणी सूर्य यायचा तो गावदेवीच्या पलीकडच्या इमारतीच्या छपरावरुन, त्यामुळे उमाठा हे प्रकरण काय आहे याची उगीच हुरहूर लागून राहिली होती. त्यानंतर डोळ्यांखालून लाखो शब्द गेले, पण " उमाठा" काही पुन्हा भेटला नाही. चंद्राला हिणवण्याचे कारण कळले नाही, ह्याचे बालपणी दुःख नव्हते. पण हा उमाठा कुठे असतो, हे मात्र कित्येक वर्षे कळले नाही. त्यानंतर वाङ:मयात् उमाळे आले, इतिहासात उमराठे आले, उंबरठेही ओलांडले, पण इन्फंटीनंतर किंवा कदाचित पहिली नजर " उमाठा" जो एकदाचा नाहिसा झाला तो पुन्हा भेटला नाही. पण मी उमाठ्याला

विसरु शकलो नाही, विसरणार नाही. या सारखे बरेच शब्द आहेत. जे पु. लं. नी आपल्या मनात जपून ठेवले होते. ' विरळा' हा शब्द काळाच्या ओघात गडप झाला. त्याऐवजी क्वचित हा शब्द रुढ झालाय. पण पु. ल. म्हणतात विरळा या शब्दाची मजा क्वचितला क्वचितच येते. या लेखातून पु. ल. नी बरेच विस्मृतीत गेलेले शब्द सांगितले आहेत. ज्यांना ते कधीही विसरले नाहीत. एका लेखकाची संवेदनशीलता काय असते. हे या लेखातून पदोपदी जाणवते.

या पुस्तकात पहिलाच लेख " म्हैस " आहे. यावरुन लक्षात येईलच की, म्हैस या विषयावर पु.ल. शिवाय आजपर्यंत कोणी क्वचितच लिहिलं असेल.

धर्मा मांडवकर यांची म्हैस प्रवास करताना एस. टी. खाली येते आणि पुढे घडलेला सर्व वृत्तांत पु. ल. आपल्या विनोदी शैलीने लिहून वाचकांना खिळवून ठेवतात. वाचकांची मात्र हा लेख...नव्हे नव्हे संपूर्ण पुस्तक वाचताना हसून हसून पुरेवाट लागते. आपल्याला वाल्मिकीचे रामायण माहित आहे. पण पु.लं.नी या पुस्तकात एका लेखात

जाल्मिकीचे लोक- रामायण लिहीले...रामायणाकडे सतत सिरीयस नजरेने पाहायची गरज नाही विनोदी अंगाने सुद्धा आपण पाहू शकतो आणि निखळ आनंद काय असतो ते आजमावू शकतो हेच जणू सांगितलं की काय असं जाणवतं राहतं. उदाहरणादाखल एका प्रसंगाबद्दल पु. लं. काय लिहितात ते सांगते...

'शूर्पणखेच्या' नाकाचे हाड वाढले होते म्हणून रामाने लक्ष्मणाला ऑपरेशन करायला लावले. लक्ष्मण स्वतःची बुद्धी कधीच वापरत नसे. राम म्हणेल ती पूर्व दिशा होती लक्ष्मणासाठी म्हणून लक्ष्मण शूर्पणखेच्या नाकावर शस्त्रक्रिया करतो. पण दुर्दैवाने जंगलात सगळी शस्त्रक्रियेची साधने नसल्यामुळे वाढलेले नाकाचे हाड कापल्यावर नाक जोडण्यासाठी आवश्यक आयुधे नव्हती व हाडाबरोबर नाक गमावून शूर्पणखा परतली. शस्त्रक्रियेत आयत्या वेळी काय

होईल ते सांगणे अवघड आहे. ह्या आणि अशाच प्रकारच्या अनेक प्रंसंगावर पु.ल. नी फिरकी घेतच लिहिलंय.... ईश्वाकू .... म्हणजे काय? तर हा संवादातून घडलेला प्रसंग आहे.

ईक्षू म्हणजे ऊस आणि वाकवून दाखवला म्हणून ईश्वाक आणि त्याला ऊ प्रत्यय लागला म्हणून ईश्वाकू. अशाप्रकारे वसिष्ठ गुरुजींनी दशरथाच्या चारही पुत्रांना ईश्वाकू घराण्याविषयी शिकवले असं पु. ल. आपल्या जाल्मिकी रामायणात लिहून जातात. महाभारतकालीन वर्तमानपत्रे या लेखात तर पु.ल. त्यांच्या वर्तमानकाळात जशा वर्तमानपत्रात बातम्या किंवा जाहिराती छापून येत असत अगदी तोच नमुना त्यांनी महाभारतातील बातम्या आणि जाहिरातींसाठी वापरायला...जसे की, 'प्रतिष्ठान येथून निघणा-या साप्ताहिक ' दंडकारण्य' पात्रासाठी काही उप अंतर्ज्ञानी नियुक्त करणे आहेत.

पात्रता...कमीत कमी एक सहस्त्र वर्षे वायुभक्षण करून तप केल्याचे विश्वामित्र- अंतर्ज्ञान विद्यापीठाचे प्रशस्तिपत्र' ..अगस्ति विद्यापीठाला अजून मान्यता मिळाली नाही.

वेतन---मासिक वेतन पाच गाई, एक बैलजोडी अशाप्रकारे जाहिरात किंवा बातम्यांची दोन काळाची सांगड घालताना पु.लं. ची सर्जनशीलता आणखी सजगता खरोखर वाखाण्यासारखी आहे. पु. लं. नी प्रत्येकविषयात निरनिराळ्या पद्धतीने फिरकी घेवून विषय मांडलेत आणि या फिरकी सदृश्य लिखाणातून त्यांनी वाचकांना निखळ आनंद दिलाय, अजूनही मिळतो आहे आणि मिळत राहणार आहे. आजपर्यंत तरी पु. लं. सारखे कुणीही लिहिले नाही, पुढे माहिती नाही. पण पु. लं. सारखे लेखक- लेखक म्हणून जन्मावे लागत असावेत. कारण निखळ विनोद निर्माण करणे आणि तो पुस्तक स्वरुपात वाचकांना देणे यासाठी विनोदाची जाण जन्मतःच असावी लागते. ठरवून विनोद निर्माण करता येत नाही. तो सहजपणे जन्मावा

लागतो आणि विनोद निर्माण होतो तो जन्मतः विनोदाची जाण असलेल्या पु. ल. या प्रतिभावंतासारख्यांच्या मनात ..... पु.ल. यांचे साहित्य वाचताना सतत जाणवतं पु.लं. सारखा प्रतिभावंत लेखक पुन्हा होणे नाही. त्यांना मनःपूर्वक अभिवादन........

*- vpatke2606@gmail.com*

# प्रिय भाई...

तीर्थस्वरूप पु ल देशपांडे यांना

साष्टांग नमस्कर विनंती विशेष...

भाई आयुष्याच्या वाटेवर अनेक व्यक्ती आणि वल्ली* भेटले. पण ‘ उरलंसुरलं ’ दुःख सोडून आनंदाचे 'गुण गाईन आवडी' असे फक्त तुम्ही... माझ्या आयुष्यामध्ये दुःखाची ‘नसती उठाठेव ’ असताना सुखाची गोळाबेरीज तुमच्यामुळे शिकले. आठवणींची ‘पुरचुंडी ’ तुमच्यामुळे आनंदाची 'गाठोडी' झाली. ‘अघळ पघळ ’ औपचारिक जगामध्ये खेळीमेळी असणारी बटाट्याची चाळ तुम्ही आम्हाला दिली.. आयुष्याचा तीन पैशांचा तमाशा झाला होता पण तुमच्या पुस्तकांमुळे साक्षात 'विठ्ठल तो आला आला' असे वाटले. आमचं वेगळेच 'मैत्र' आहे तुमच्या बरोबर. या साहित्याची 'अपूर्वाई' कायम आहे. मूर्त 'हसवणूक' आहात तुम्ही. कधीतरी तुमच्यामुळे आयुष्याची बाग बघून 'ती फुलराणी' म्हणावसं वाटतं. 'एक शून्य मी म्हणत' म्हणत आम्ही 'एक झुंज वाऱ्याशी दिली'. तुमचं साहित्य वाचून खऱ्या अर्थाने 'सुंदर मी होणार'. तुमच्यामुळे आम्ही स्वतःला भाग्यवान समजतो...

तुम्हाला त्रिवार वंदन,

मधुरा मिलिंद कुलकर्णी

- kulkarnimira28@gmail.com

# प्रवासवर्णनातील पु.लं.

**- दिशा राजकारणे टिकेकर**

पु. ल देशपांडे यांच्या व्यक्तीत्वाचे विशेष म्हणजे त्यांची विनोदवृत्ती. भोवतालच्या समाजाकडे, जीवनाकडे, आणि माणसांकडे ते विनोदवृत्तीने बघत. एक विनोदी लेखक अशी त्यांची ख्याती आहे.

'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' या दोन्ही प्रवासवर्णनात त्यांच्या विनोदवृत्तीचा अविष्कार दिसून येतो. प्रवासाच्या निमित्याने पु. लं यांना आलेल्या विविध अनुभवांचे, भावनांचे, कल्पनांचे आणि मनात उमटलेल्या विचारांचे त्यांनी विनोदाच्या माध्यमातून अविष्कार केले आहे. पु. लं देशपांडे आपली प्रवासचित्रे व प्रवासातील असंख्य क्षण अमर करत. त्यांची दोन्ही प्रवासवर्णने वाचकांना खूप आवडली आणि लोकप्रियही झाली.

पु. लं देशपांडे यांनी नाटक, बालनाट्य, चित्रपट, व्यक्तीचित्रे अशा विविध वाङ:मय प्रकारातून लेखन केले असले तरी त्यांचा मूळपिंड हा विनोदी लेखकाचा होता. विनोद हा त्यांच्या लेखनाचा स्थायीभाव आहे. हसणे आणि हसवणे ही मानवाची मूळ प्रवृत्ती आहे. विनोदामुळे हास्य निर्माण होते परंतु प्रत्येक हास्यातून विनोद निर्माण होतोच असे नाही. , पु. लं नेहमी म्हणत, "हास्यामध्ये निर्मलता असेल तरच तो विनोद असतो. ज्या हास्यामुळे दुसऱ्याला दु:ख होते, अपमान होतो त्याला विनोद म्हणता येणार नाही. विनोद हा नेहमीच दुसऱ्याला आनंद देणारा असावा".

नाटक आणि संगीत याच्या विषयी पु. लं यांना कमालीची आत्मियता होती.

त्यामुळे प्रवासवर्णन सारख्या लेखनातही त्यांच्या संगीत प्रेमाचे सूर उमटले आहे. ‘अपूर्वाई’ मध्ये पाश्चात्य देशांचा प्रवास तर ‘पूर्वरंग’ मध्ये पूर्वेकडील देशांचा प्रवास करतांना त्यांनी त्या प्रदेशातील नृत्य, संगीत अशा कार्यक्रमांचा आस्वाद घेतांना आलेल्या अनुभवांचे रसरशीत वर्णन केले आहे. स्कॉटलँड मध्ये ‘बॅगपाईप' या वाद्याचे संगीत, शेक्सपियरच्या गावी नाटक पाहतांना आलेला अनुभव असो. मलाया, इंडोनेशिया येथील पौराणिक नाटके, बाली बेटावर संगीत नाटक पाहतांना आलेला अनुभव, बँकॉक संगीत शाळेतील भेटीत आलेला अनुभव तसेच जपानमध्ये हॉटेलमधून चालणारी संगीतनृत्ये यांची केलेली वर्णने पाहतांना त्यांचे नाट्यप्रेम आणि संगीतप्रेम दिसून येते.




पु. लं आपल्या लेखनासंबंधी म्हणत “नैराश्याचा अंध:कार नाहीसा करणे हे माझ्या विनोदाचे प्रयोजन आहे” विनोद साधतांना काही वेळेला मराठी शब्दांचा, म्हणींचा, वाक्प्रचारांचा तर काही वेळेला कोकणी, संस्कृत, जपानी, इंग्रजी शब्दांचा उपयोग केलेला दिसून येतो. “अपूर्वाई’ आणि “पूर्वरंग” या दोन्ही प्रवासवर्णन पुस्तकात त्यांनी पाश्चात्य देशातील रुढी, परंपरा यांना भारतीय पद्धतीने नावे दिली आहेत. एका दृष्टीने परदेशी कल्पनांचे त्यांनी मराठीपण केले आहे. असे काही

वैशिष्टपूर्ण शब्द या दोन्ही पुस्तकात आढळतात. जसे, 'बेड टी' म्हणजे 'शय्या पेय' आणि 'नाईट क्लब' म्हणजे 'निशागृह'

पु. लं देशपांडे यांच्या दोन्ही प्रवासवर्णनातून आपल्याला त्यांच्या चित्रमयशैलीचा प्रत्येक येतो. एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग, एखादी वस्तू एखादे दृष्य यांचे वर्णन करतांना ते वाचकांसमोर त्यांचे साक्षात चित्र उभे करत त्यामुळे चित्रमयता हा त्यांच्या दोन्ही प्रवासवर्णनाचा एक विशेष आहे.




'अपूर्वाई' मध्ये प्रारंभिक प्रवासाची तयारी करतांना सूट-बूट, कपडे, विमानाची तिकीटे, पासपोर्ट तयार करतांना कशी धांदल उडाली याचे केलेले वर्णन अगदी चित्रमय आहे. लंडन शहरात प्रवेश करतांना सकाळी असणारी शांतता याचे वर्णन ही असेच आहे. इंग्लंडमधील भुयारी रेल्वे आणि रेल्वे स्टेशन याचे वर्णन, इंग्लंडमधील स्त्रीयांची चपळता त्यांची प्रसाधनांची आवड यांची त्यांनी वास्तवचित्रे टिपली आहेत. स्कॉटलँडच्या संध्याकाळी एका वादकाचे 'बॅगपाईप' वाद्याचे स्वर कसे भारावून टाकत होते याचे वर्णन म्हणजे स्वरचित्रच.

'पूर्वरंग' मध्येही अशीच चित्रमयता आढळून येते. मलायाच्या राजेसाहेबानचे कोलंबो बंदरात स्वागतासाठी सरकारी नोकराची जी

धांदल चालली होती याचे वर्णन पु. लं नी अगदी मिष्कीलपणे केले आहे. जकार्तामधील एका थिएटरमध्ये नाट्यसंगीताचा कार्यक्रम पाहतांना आलेला भयानक अनुभव तिथल्या नटांनी महाभारतातील केलेली भूमिका याचे पु. लं नी विनोदी पद्धतीने केलेले वर्णन अर्थपूर्ण आहे.

बँकॉकच्या तरंगत्या बाजाराचे वर्णन पाहण्यासारखे आहे. बाली बेटावर बाली युवती चे पाहिलेले नृत्य पु. लं यांना अजंठा लेण्याची आठवण करून देत. पूर्वेकडील देशात प्रामुख्याने त्यांना चिनी आणि जपानी समाजाचे लोक दिसले. चिनी लोकांचा गलीच्छपणा चेहऱ्यावरील गूढता तसेच जपानी लोकांचे आदरातिथ्यपणा, प्रखर धर्मश्रद्धा त्यांचे निसर्गवेड हे पु. लं नी वेगवेगळ्या प्रसंगातून टिपले आहे. अशा प्रकारे या दोन्ही प्रवासवर्णनात त्यांनी चित्रमय शैलीचा वापर केलेला दिसून येतो.

पु. लं देशपांडे यांचे साहित्यावर विशेषता कवितांवर प्रेम आहे. दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तकात त्यांनी मराठी व संस्कृत कवितांतील ओळींचा उल्लेख केला आहे. त्यांचे काव्यावर प्रेम आहे याचे एक परिणाम म्हणजे काही अनुभवांचे वर्णन करतांना त्यांची भाषा काव्यमय होते. इंग्लंड मधील इंग्रज आपल्या मातीवर किती प्रेम करतो हे सांगताना पु. लं म्हणतात ‘इंग्रज हा हाडाचा शेतकरी आहे. त्याला चिखलात हात बुचकळून काढल्याशिवाय चैनच पडत नाही. बरेचसे इंग्रज बाग करायला घर घेत असावेत. स्वतःच्या परसातील भाज्या पाहूनच त्याला ढेकर येत आणि म्हणूनच बहुतेक इंग्रज सुट्टीत खेड्यांच्या दिशेने पळत. मायभूमीच्या मातीत हात खुपसत.

प्रत्येक देशातील लोक दुसऱ्या भाषेचा वेगवेगळ्या पद्धतीने उच्चार करीत असल्याने त्यांची भाषा कशी गमतीशीर होते हे त्यांनी अनेक उदाहरणातून दाखवून दिले आहे. जसे पु. लं नी ‘गुड मॉर्निंग’ म्हणताच इंग्लंड

बाबतीत पु. लं म्हणतात, परदेशी भाषा शिकणे आणि वापरणे किती अवघड आहे. “फ्रेंच भाषा शिकणे हे मला तर भरतनाट्यम शिकण्याइतके अवघड वाटते कारण फ्रेंच भाषा आल्याखेरीज पॅरिसमध्ये राहायचे म्हणजे चोंदल्या नाकाने सुगंधाच्या दुकानात बसण्यासारखे आहे ”.

पु. ल देशपांडे म्हणजे महाराष्ट्राच्या मुखावरील निखळ, निर्मळ स्मित. असा निर्मळ विनोदी साहित्यिक महाराष्ट्रात दुसरे होणे नाही.

- *tikekardisha@gmail.com*

# संगीतकार पु. ल

## - भक्ती पानसे

पु. ल. देशपांडे एक असामान्य व्यक्तिमत्व नाटककार साहित्यकार विनोद तत्त्वज्ञान कवी गायक संगीत दिग्दर्शक लेखक वक्ते मराठी साहित्यातील असं कुठलंच कार्य क्षेत्र नाही जिथे पु लं नी त्यांच्या असामान्य कर्तुत्वाचा ठसा उमटविला नाही..




जेव्हा जेव्हा पु. लं ना त्यांच्या हार्मोनियम ची साथ मिळाली तेव्हा तेव्हा एका पेक्षा एक श्रवणीय असे संगीत आपल्या कानांना तृप्त करून गेले आहे.. संगीत दिग्दर्शक म्हणुन त्यांच्या अनेक गाण्यांना नावाजलेल्या अन मोठ्या गायकांचे आवाज लाभलेले आहेत.. जसे पंडित भीमसेन जोशी, आशा भोसले, वसंतराव देशपांडे, माणिक वर्मा.. तसेच महाराष्ट्रातील घराघरांत पोचलेले लहान मुलांचे गाणे.. " नाच रे मोरा " , ह्याची सुमधूर आणि खिळवून ठेवणारी चाल ही

देखील आपल्या भाईंचीच कलाकृती लहानपणापासूनच घरात संगीत असल्याकारणाने त्यांच्यावर संगीताचा प्रभाव पगडा होताच तसेच त्यांचे वाचन सुद्धा दांडगे होते. मराठी संगीतातील अनेक गाण्यांना पुलनी सुमधुर चाली लावलेल्या आहेत जसे राजा बढे यांनी लिहिलेले " माझिया माहेरा जा " हे अजरामर गीत किंवा ग. दि. माडगूळकर यांनी रचलेल्या आणि पंडित भीमसेन जोशी यांनी गायलेल्या "इंद्रायणी काठी " हे अनमोल गीत !!!

आपण त्यांना लेखक वक्ते कवी म्हणून तर ओळखतोच पण त्यांनी वंदे मातरम्, दूधभात, गुळाचा गणपती या चित्रपटांमध्ये सुद्धा अष्टपैलू अशी कामगिरी केली आहे.

"गुळाचा गणपती" या चित्रपटात आपल्याला असेही म्हणता येईल की इथे सबकुछ पु. लं असंच होते कथा, पटकथा, गीतरचना, संगीत, भूमिका शिवाय दिग्दर्शन सगळंच पु लं नी केलेलं होतं. याच चित्रपटातलं "इंद्रायणी काठी" हे पुलंनी चाल लावलेलं गीत पंडितजींनी गाऊन अजरामर केलं

माझ्या वाचनात आलेली भाईंची काही प्रासंगिक वाक्य मी नमूद करु इच्छिते !!

पु. लं. नी म्हटलेले की एखादा प्रश्न सरकारच्या विचाराधीन आहे या इतके दुसरे विनोदी विधान नाही.. म्हणजेच सरकार हे सामान्यांच्या प्रश्नांवर विचार सुद्धा कसे करते ही गोष्टच नवल आहे !! फटाक्यांच्या बंदीवर पु लं  म्हणतात की अजब सरकार असं आहे की फटाके विकायला बंदी नाही व फटाके विकत घ्यायला सुद्धा बंदी नाही.. पण विकत घेतलेले फटाके फोडायला मात्र जरूर बंदी असणार हे अजबच नाही का !!

- *bhakti25marathe@gmail.com*



पु.ल. देशपांडे
तीन पैशाचा तमाशा
मराठी वाङ्मयाचा (गाळीव) इतिहास
पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे
गाठोडं
पु. ल. देशपांडे
परचुरे
गणगोत
पु.ल. देशपांडे
हसवणूक
पु.ल. देशपांडे
पु.ल. देशपांडे
अपूर्वाई
पूर्वरंग
पु. ल. देशपांडे
असा मी असामी
पु.ल. देशपांडे
ती फुलराणी
पु.ल. देशपांडे
नस्ती उठाठेव
पु.ल. देशपांडे
BookGanga.com
बटाट्याची चाळ
पु.ल. देशपांडे